जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३९४ दिनांक - २७/०५/२०२३**

**लोणीकंद पोलीस स्टेशन, पुणे शहर**

## तानाजी जाधव व त्याचे इतर ०२ साथीदार यांचे विरुध्द मकोका कारवाई

लोणीकंद पोलीस स्टेशन हद्दीत दि. ०४/०५/२०२३ रोजी लोणीकंद-केसनंद रोडवरील भंगार विक्रेत्याला एकटे गाठुन अनोळखी ३ इसमांनी जबरदस्तीने पैशाची मागणी केली असता तक्रारदार यांनी त्यांना पैसे देण्यास नकार दिल्याने अनोळखी तीन इसमांनी संगनमत करुन तक्रारदार यांना जखमी करुन त्यांचे खिशातील रक्कम जबरदस्तीने चोरुन नेली होती. त्याबाबत लोणीकंद पोलीस स्टेशन पुणे शहर गु.रजि.नं. ३५१/२०२३ भा.दं.वि. कलम ३९४, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याच्या तपासा दरम्यान सदर गुन्हा हा टोळी प्रमुख **१) तानाजी अर्जुन जाधव, वय २२ वर्ष, रा. लाडबा वस्ती, वाबळे यांचे गाईच्या गोठया शेजारी, केसनंद ता.हवेली जि.पुणे व त्याचे इतर दोन साथीदार नामे २) रोहित राजु माने, वय २१ वर्ष, रा. गुजर वाडी, निंबाळकर वस्ती, खोपडे नगर, दत्त मंदीराचे पाठीमागे कात्रज पुणे ३) ओमकार नरहरी आळंदे वय २१ वर्ष, रा. वडगाव रोड, बालाजी वस्ती, केसनंद, ता. हवेली, जि. पुणे** यांनी केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने त्यांना दाखल गुन्ह्याचे तपास कामी अटक करण्यात आली असुन ते सध्या येरवडा जेल मध्ये आहेत.

आरोपी तानाजी जाधव (टोळी प्रमुख) याने दाखल गुन्ह्यातील साथीदार यांचे सह यापुर्वी देखील एकत्रित गंभीर स्वरुपाचे गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले. ते वारंवार आर्थिक फायद्यासाठी जबरी चोरी, घातक हत्याराचा वापर करुन गंभीर दुखापत करुन जबरी चोरी, देवाच्या मंदिरातील दानपेटी फोडुन चोरी करणे, तसेच इतर चोरी यासारखे गुन्हे संघटितपणे करीत असल्याचे पुर्व रेकॉर्डवरुन दिसुन आल्याने प्रस्तुत गुन्ह्यात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३(१)(ii), ३(२), ३(४) या कलमांचा अंतर्भाव करणेकामी लोणीकंद पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. गजानन पवार यांनी मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०४ पुणे श्री शशीकांत बोराटे, यांचे मार्फतीने मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे श्री रंजनकुमार शर्मा यांना प्रस्ताव सादर केला होता.

सदर प्रकरणाची छाननी करुन वरील अटक आरोपी यांना लोणीकंद पोलीस स्टेशन पुणे शहर गु.रजि.नं. ३५१/२०२३ भा.दं.वि. कलम ३९४, ३४ या दाखल गुन्ह्यात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४) अंतर्भाव करण्याची परवानगी श्री रंजन कुमार शर्मा अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग पुणे शहर यांनी मान्यता दिली आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस आयुक्त, येरवडा विभाग पुणे शहर श्री किशोर जाधव हे करीत आहे.

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा. पोलीस आयुक्त पुणे शहर श्री रितेशकुमार, मा. पोलीस सह आयुक्त पुणे श्री संदिप कर्णीक, मा.अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग पुणे श्री रंजनकुमार शर्मा, मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०४ पुणे श्री. शशिकांत बोराटे, सहा.पोलीस आयुक्त येरवडा विभाग पुणे श्री किशोर जाधव, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक लोणीकंद पोलीस स्टेशन श्री गजानन पवार, पोलीस निरीक्षक गुन्हे श्री. मारुती पाटील, सहा. पोलीस निरीक्षक गजानन जाधव, पोलीस उप निरीक्षक श्रीकांत टेमगिरे, रामकृष्ण दळवी व सर्व्हेलन्स पथकातील पोलीस अंमलदार प्रशांत कापुरे, सागर कडु यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी कार्यभार घेतल्यानंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईने लक्ष देऊन शरिराविरुध्द व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व लोकांमध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवून,गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्या बाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत. **त्यांचे मार्गदर्शनाखाली मकोका अंतर्गत केलेली ही २६ वी कारवाई आहे.**